# कल्याणमध्ये ३३३ तळीरामांवर कारवाई!

## वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३१३ वाहनचालकांना दंड

वार्ताहर

कल्याण, दि. १ – नववर्षाचे स्वागत करताना दारू पिऊन गाडी चालवणाऱ्या ३३३ जणांवर कल्याण परिमंडळ–३ अंतर्गत पोलिसांनी कारवाई केली आहे. गेल्या काही वर्षांत ड्रंक अँड ड्राईव्हमुळे वाढलेल्या अपघातांच्या घटना पाहता पोलिसांनी दारू पिऊन गाडी चालवू नका, असे आवाहन नागरिकांना केले होते.

यासाठी कल्याण परिमंडळ–३ चे पोलीस उपायुक्त संजय शिंदे यांनी तब्बल ६५० पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात केला होता. या तैनात पोलिसांनी तब्बल ३३३ मद्यपी वाहन चालकांविरोधात गुन्हा दाखल करत दणका दिला. तसेच दिवसभरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३१३ वाहनचलकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करताना मद्यधुंद लोकांमुळे इतरांच्या आनंदावर विरजण येऊ नये, यासाठी पोलिसांनी विशेष पथके निर्माण करत प्रचंड फौज फाटा रस्त्यावर उतरवला होता. तसेच मोठ्या प्रमाणात नाकाबंदी करून थेट कारवाई करत तळीरामांची धुंद उतरवली. कल्याण वाहतूक पोलीस व शहर पोलीस यांनी संयुक्त कारवाई करत कल्याण पश्चिम १२९, कल्याण पूर्व ९४, डोंबिवली ११० अशा एकूण मिळून ३३३ तळीरामांवर कारवाईचा बडगा उगारला. तर भरधाव वाहतूक, ट्रिपल सीट, विना परवाना, काळ्या काचा आदी कल्याण पश्चिम १५०, कल्याण पूर्व १००, डोंबिवली ६३ अशा एकूण ३१३ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली.

### नववर्षाच्या पूर्वसंध्येला भिवंडीत ३१६ तळीरामांना दणका

वार्ताहर

भिवंडी, दि. १ – नववर्षाच्या स्वागताला मद्य प्राशन करून वाहन चालवणाऱ्या ३१६ तळीरामांवर भिवंडीत वाहतूक शाखेकडून कारवाई करण्यात आली असल्याची माहिती वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त अविनाश मोहिते यांनी दिली.

मद्य प्राशन करून नववर्षाचे स्वागत करण्याची सध्या सर्वांत चढाओढ लागलेली असते. त्यासाठी ३१ डिसेंबरच्या रात्री मद्यप्राशन करून वाहन चालवण्याचे प्रमाण कमालीचे वाढत असल्याने त्यातून होणारे अपघात व मृत्यूंस आळा बसावा, यासाठी ३१ डिसेंबरच्या रात्री सर्वत्र वाहतूक पोलीस दलाकडून ठिकठिकाणी चौकात नाकाबंदी करून वाहन चालकांची तपासणी केली जाते. भिवंडी शहरात अशा प्रकारे राबवलेल्या विशेष मोहिमेत भिवंडी वाहतूक शाखा येथे ६४, नारपोली वाहतूक शाखा १४७, तर राजनोली वाहतूक शाखा येथे १०५ अशा एकूण ३१६ तळीरामांवर मद्य प्राशन करून वाहन चालवल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




**सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करताना मद्यधुंद लोकांमुळे इतरांच्या आनंदावर विरजण येऊ नये, यासाठी पोलिसांनी विशेष पथके निर्माण करत प्रचंड फौज फाटा रस्त्यावर उतरवला होता. तसेच मोठ्या प्रमाणात नाकाबंदी करून थेट कारवाई करत तळीरामांची धुंद उतरवली.**

### भिवंडीत एमडी ड्रग्ज बाळगणाऱ्याला अटक

वार्ताहर

भिवंडी, दि. १ – युवापिढीला बर्बाद करणाऱ्या एमडी ड्रग्जचा शहरात शिरकाव झाला असून, नववर्षाच्या पूर्वसंध्येस भिवंडी शहरातील नारपोली पोलीस स्टेशन हद्दीत ठाणे गुन्हे मध्यवर्ती शाखेने एमडी ड्रग्ज बाळगणाऱ्या युवकांना अटक केली. त्यांच्या जवळ २ लाख १० हजार रुपये किमतीची २१० ग्रॅम एमडी पावडर आढळली असून, फरहान अब्दुल खालिद खर्बे रा.निजामपुरा भिवंडी असे अटक आरोपीचे नाव आहे.

ठाणे गुन्हे मध्यवर्ती शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक होनराव यांना भिवंडी शहरात एक व्यक्ती एमडी ड्रग्ज घेऊन कारने येत असल्याची माहिती मिळाल्यावर त्यांच्या पथकाने अंजूर फाटा कामतघर रोडवरील चौकात सापळा रचला होता.

रात्रीच्या सुमारास आलेल्या संशयास्पद स्विफ्ट डिझायर कारचालक फरहान अब्दुल खालिद खर्बे निजामपुरा भिवंडी याच्या कारची झडती घेतली असता कारमध्ये प्लास्टिक पिशवीत २१० ग्रॅम एमडी पावडर असल्याचे आढळली असता ती जप्त करून फरहान अब्दुल खालिद खर्बे याला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी फरहानवर गुन्हा दाखल केला आहे.

# 'प्रतिमा– नवी मुंबईची' छायाचित्रण स्पर्धेचे पुरस्कार वितरण

वार्ताहर

नवी मुंबई, दि. १ – महापालिका क्षेत्रातील व्यावसायिक व हौशी छायाचित्रकारांना व्यासपीठ मिळावे म्हणून आयोजित केल्या जाणाऱ्या 'प्रतिमा – नवी मुंबईची' छायाचित्रण स्पर्धेतील व्यावसायिक गटातील विजेते छायाचित्रकार बच्चन कुमार, नरेंद्र वास्कर, विवेक थोरात, संदेश रेणोसे, सत्यवान वास्कर तसेच हौशी गटातील विजेते छायाचित्रकार शुभम मालाडकर, संध्या जैन, नयन वास्कर अशा आठ विजेत्या छायाचित्रकारांना व्यावसायिक गटात प्रत्येकी २० हजार व हौशी गटात प्रत्येकी १० हजार अशी पारितोषिके स्मृतिचिन्हासह प्रदान करण्यात आली.



सुप्रसिद्ध छायाचित्रकार अतुल लोके यांनी या छायाचित्रण स्पर्धेचे परीक्षण केले. स्पर्धेतील विजेत्या आठही छायाचित्रकारांच्या छायाचित्रांचा समावेश 'नवी मुंबई महानगरपालिका दिनदर्शिका २०१९' मध्ये करण्यात आला आहे.


## सांकेतिक कब्जा सूचना

ICICI Bank
ICICI Bank Limited

**नोंदणीकृत कार्यालय :** आयसीआयसीआय बँक टॉवर, चकली सर्कल जवळ, जुना पादरा रोड, वडोदरा–३९०००७, गुजरात.
**कॉर्पोरेट कार्यालय :** आयसीआयसीआय बँक टॉवर्स, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–४०००५१.
**शाखा कार्यालय:** आयसीआयसीआय बँक लिमिटेड, कार्यालय क्र.२०१–बी, २ रा मजला, रोड क्र.१, प्लॉट क्र.– बी३, वायफाय आयटी पार्क, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, ठाणे (पश्चिम)– ४००६०४.

**ज्याअर्थी,**
निम्नस्वाक्षरीकारांनी आयसीआयसीआय बँक लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसात सूचनेत नमूद केलेली रक्कम चुकती करण्यासाठी खालील नमूद कर्जदारांना मागणी सूचना जारी केलेली आहे.
कर्जदारांनी सदरहू रक्कम चुकती करण्यास कसूर केलेली आहे म्हणून कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खालील नमूद तारखेरोजीस सदरहू अधिनियमाच्या कलम १३(४) सहवाचता सदरहू नियमावलीच्या नियम ८ अन्वये त्याला/तिला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील वर्णिलेल्या मिळकतीचा सांकेतिक कब्जा घेतलेला आहे. विशेषत: कर्जदार अणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करु नये आणि सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा कोणताही व्यवहार हा आयसीआयसीआय बँक लिमिटेडच्या प्रभाराच्या अधीन राहील.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव/कर्ज खाते क्रमांक | मिळकतीचे वर्णन/सांकेतिक कब्जाची तारीख | मागणी सूचनेची तारीख/मागणी सूचनेतील रक्कम (रु.) | शाखेचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | अल्पेश मार्बल्स प्रा. लि. / श्री. इंदरमल जैन/ श्री. भरत दोशी– ००२८०५००४२०२ | फ्लॅट क्र. ४८, ८ वा मजला, सी विंग, आनंद दर्शन सीएचएसएल, पडर रोड, मुंबई महाराष्ट्र–४०००२६/ डिसेंबर २७, २०१८. | सप्टेंबर २६, २०१८ रु. १,२९,२९,६७७.४६/– | मुंबई |

वरील नमूद कर्जदार/हमीदार यांना रक्कम चुकती करण्यासाठी याद्वारे ३० दिवसाची सूचना देण्यात येत आहे, अन्यथा सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ आणि ९ अंतर्गत तरतुदींनुसार सदर सूचना प्रसिध्दी तारखेपासून ३० दिवसाच्या समाप्तीनंतर गहाण मिळकतीची विक्री करण्यात येईल.

सही/–
**दिनांक: ०२–०१–२०१९** प्राधिकृत अधिकार
**ठिकाण : मुंबई** आयसीआयसीआय बँक लिमिटेड


# विविध योजनांसाठी ठाणे महापालिका व रूबल नागी फाऊंडेशनमध्ये सामंजस्य करार

वार्ताहर

ठाणे, दि. १ – राज्य शासनाच्या महापरिवर्तन या उपक्रमांतर्गत शहरातील झोपडपट्ट्यांत आमूलाग्र बदल घडवण्याच्या दृष्टीने त्यांना आकर्षक रंग देणे, महापालिका शाळांत विद्यार्थ्यांना चित्रकला प्रशिक्षण देणे या दोन योजनांबाबत रुबल नागी फाऊंडेशन आणि ठाणे महापालिका यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

या करारावर महापालिका आयुक्तांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आल्या. समाजातील विविध स्वयंसेवी संस्थांनी विविध सामाजिक विषय आणि आदर्श मूल्यांबाबत पुढाकार घेण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. त्यानुसार ठाणे महापालिका क्षेत्रात महापरिवर्तन उपक्रमांतर्गत एकूण सहा प्रकल्प राबवण्यात येणार आहेत. त्यात झोपडपट्टी रंगवणे आणि महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांना चित्रकला प्रशिक्षण देणे हे दोन प्रकल्प रूबल नागी फाऊंडेशनच्या वतीने राबवण्यात येणार आहेत.

या दोन प्रकल्पांच्या अनुषंगाने मंगळवारी रुबल नागी फाऊंडेशन आणि ठाणे महापालिका यांच्या दरम्यान सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. यापूर्वीही रूबल नागी फाऊंडेशनच्या माध्यमातून इंदिरानगर आणि डोंगरीपाडा या २ झोपडपट्ट्या रंगवण्यात आल्या होत्या. सद्यस्थितीत पारसिक रेतीबंदर येथील आठ झोपडपट्टी रंगवण्याचा उपक्रम सुरू आहे. त्याचप्रमाणे महापालिकेच्या १०० शाळांत चित्रकला प्रशिक्षण या संस्थेच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. यासाठी येणारा खर्च महापालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे.

२०१९–२० या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात येणार आहे. रूबल नागी फाऊंडेशनच्या माध्यमातून संपूर्ण देशभर स्लम पेटिंग आणि आर्ट स्कूल हे प्रकल्प राबवण्यात आले आहेत. याबरोबरच महापरिवर्तन उपक्रमांतर्गत टाटा ट्रस्टच्या माध्यमातून महापालिकेच्या १०० शाळात हात धुण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तर टाटा ट्रस्ट व वर्ल्ड रिसोर्स इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने वनसंगोपन व संवर्धन याविषयी माहिती तयार करणे आणि त्याबाबत जनजागृती करणे, हा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. रेमंड कंपनीच्या वतीने महापालिका शाळांत मूल्य संवर्धन कार्यक्रम राबवण्यात येणार आहे.


बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बँक

**मुख्य कार्यालय : ''लोकमंगल'', १५०१, शिवाजीनगर, पुणे–४११००५**
**विभागीय कार्यालय: मुंबई विभागीय कार्यालय, जनमंगल ४५/४७, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई–२३. टेलिफोन : ०२२–२२६७५८९९**
**शाखा कार्यालय : रानडे रोड शाखा, समाराधी हाईट्स, डी. एल. वैद्य रोड, दादर, मुंबई–४०० ०२८.**
**दूरध्वनी क्र. : ०२२–२४२२६१०५ ई–मेल : cmmarc_mcr@mahabank.co.in**

**स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी विक्री सूचना**
**(जोडपत्र – IV–ए)**
**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या परंतुकासह वाचत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना**

सर्वसामान्य जनता आणि विशेषकरून कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, कोष्टकात वर्णन केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांकडून बँक ऑफ महाराष्ट्रला येणे असलेल्या उर्वरित थकबाकीच्या वसुलीकरिता बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कब्जात घेतलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र (तारणी धनको) कडे गहाण असलेली खालील स्थावर मिळकत **''जसे आहे जेथे आहे तत्त्वाने, जसे आहे जे आहे तत्त्वाने** आणि **जे काही आहे तेथे आहे तत्त्वाने''** विकली जाणार आहे. कर्जदार व जामीनदार थकबाकी रक्कम, मिळकतीचे संक्षिप्त वर्णन आणि राखीव किंमत व इसारा अनामत रक्कम याबाबतचे तपशील खालीलप्रमाणे.

| कर्जदारांचे नाव आणि पत्ता | जामीनदारांचे नाव आणि पत्ता | जिच्या वसुलीसाठी मिळकत विकली जात आहे ती थकबाकी रक्कम (मागणी सूचनेप्रमाणे) |
|---|---|---|
| **मे. विजय इंडस्ट्रीज**<br>**पत्ता** : बी–७०६, ७ वा मजला, ऑक्सफर्ड चेंबर, साकी विहार, अंधेरी पूर्व, मुंबई–४०० ०७२.<br>पर्यायी पत्ता: विजय इंडस्ट्रीज, प्लॉट क्र. ४२, आटगाव इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, मुंबई–नाशिक हायवे, ता. शहापूर, जि. ठाणे. | **श्री. विजय गांगियानी,** फ्लॅट क्र. १०८, १ला मजला, बी–विंग, रेनबो को–ऑप. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, रहेजा विहार कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र. ५, सब–प्लॉट क्र. ए सीटीएस क्र. ११९ धारक, एफ/३, गाव तुंगवा, चांदिवली, मुंबई–४०० ०७२. | कॅश क्रेडिट सुविधेसाठी **रु. ३,००,४७,७४८.४६/–** अधिक ०३.०७.२०१४ पासून द. सा. १३.६५% दराने न लावलेले व्याज आणि टर्म लोनसाठी **रु. ५०,९४,८७६.१४** अधिक **०३.०७.२०१४** पासून द.सा. १५.४०% दराने न लावलेले व्याज<br>**मिळकतीचे निरीक्षण**<br>**११.०१.२०१९ रोजी स. ११.०० ते सं. ०५.००** मध्ये (कृपया मिळकतीच्या निरीक्षणासाठी शाखा प्रमुख श्री. विलास दातालकर–९४२०८४०२९८ येथे संपर्क साधावा.)<br>**ई–लिलावाची तारीख आणि वेळ**<br>**२४.०१.२०१९ रोजी स. ११.३० ते दु. ०१.३०** मध्ये, शेवटच्या ५ मिनिटांत बोली लावल्यास ५ मिनिटांसाठी ऑटो एक्स्टेन्शनसह होईल.<br>**साठी तारीख आणि वेळ**<br>सहभागासाठी विनंती पत्र/केवायसी दस्तावेज/इअर जमा/इअरचा पुरावा इ. सादरीकरण **२२.०१.२०१९ रोजी सं. ०५.००** पर्यंत. |

| अ. क्र. | मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत | इ.अ.र. रक्कम | बोली वाढीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | प्लॉट क्र. ४२, त्यावरील बांधकाम आणि संरचनांसह, आटगाव इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, मुंबई हायवे, ता. शहापूर, जि. ठाणे, मोजमापाने–१३५० चौ. मी. | रु. ७६,९५,०००/– | रु. ७,६९,५००/– | रु. ५०,०००/– |

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया बँकेच्या वेबसाईटवर दिलेली लिंक *https://www.bankofmaharashtra.in/propsale.asp' पाहावी.

सही/–
(रोहित सहस्त्रबुद्धे, मोबाईल क्र. ७०४५७८६०८८)
**दिनांक : ०१.०१.२०१९** चीफ मॅनेजर (एआरसी) व प्राधिकृत अधिकारी
**ठिकाण : मुंबई** बँक ऑफ महाराष्ट्र


# नवी मुंबई महापालिकेचा २७ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

वार्ताहर

नवी मुंबई, दि. १ – महापालिकेचा वर्धापनदिन १ जानेवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. मागील वर्षभरातील कामांच्या वाटचालीचा आढावा घेतानाच, आगामी वर्षात नागरिकांना अधिक दर्जेदार सुविधा देण्यासाठी आपण सर्वजण कटिबद्ध आहोत, अशा शब्दांत मनोगत व्यक्त करत नवी मुंबईचे महापौर जयवंत सुतार यांनी सर्व लोकप्रतिनिधी, अधिकारी–कर्मचारी, नागरिकांच्या सामूहिक सहभागातून नवी मुंबईचा देशातील उत्तम शहर म्हणून होणारा नावलौकिक अधिक उंचावर नेण्यासाठी सर्व मिळून प्रयत्न करुया, असे आवाहन केले. वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात झालेल्या नवी मुंबई महापालिकेच्या २७ व्या वर्धापनदिन समारंभानिमित्त त्यांनी मनोगत व्यक्त केले..



या प्रसंगी महापौर जयवंत सुतार यांच्यासमवेत व्यासपीठावर बेलापूर विधानसभा सदस्य आमदार मंदाताई म्हात्रे, ऐरोली विधानसभा सदस्य आमदार संदीप नाईक, महापालिका आयुक्त डॉ. रामास्वामी एन., सभागृह नेते रवींद्र इथापे, प्रभाग समिती अध्यक्ष अनिता मानवतकर, नगरसेवक नामदेव भगत, शुभांगी पाटील, प्रकाश मोरे, लीलाधर नाईक, गिरीश म्हात्रे, सुनील पाटील, संगीता बोऱ्हाडे, परिवहन समिती सदस्य प्रदीप गवस, राजू शिंदे, सुधीर पवार, अतिरिक्त आयुक्त रवींद्र पाटील व महावीर पेंढारी आणि मान्यवर उपस्थित होते.

महापालिका आयुक्त डॉ. रामास्वामी एन. यांनी, मागील वर्षात मिळालेल्या पुरस्कारांचा तसेच महत्त्वाचा कामांचा विशेष उल्लेख करीत सर्व क्षमता पणाला लावून आगामी काळातही अधिक उल्लेखनीय काम करण्याचा विश्वास व्यक्त केला. स्वच्छ सर्वेक्षणात नेहमीच आघाडीवर असलेले आपले शहर लोकप्रतिनिधी व सर्व नागरिकांच्या सहयोगाने या वर्षीच्या स्वच्छ सर्वेक्षण २०१९ मध्ये आपले देशातले मानांकन आणखी उंचावेल, अशी खात्री असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

यानिमित्त नवी मुंबई महापालिकेच्या २०१९ च्या दैनंदिनी व दिनदर्शिकेचे प्रकाशन महापौर जयवंत सुतार यांच्या हस्ते झाले. त्याचप्रमाणे नवी मुंबई महापालिका कर्मचारी अधिकारी संघटनांच्या साथ या माहितीपूर्ण मोबाईलचा शुभारंभ महापालिका आयुक्त डॉ. रामास्वामी एन. यांच्या हस्ते झाला.

त्याचप्रमाणे महापालिकेच्या आंतर विभागीय क्रीडा स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभही या वेळी करण्यात आला. मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.धनराज गरड यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या लेखा विभागाने संपूर्ण क्रीडा स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतपदाचा चषक मान्यवरांच्या हस्ते स्वीकारला.

## कल्याण–डोंबिवलीतील जुन्या इमारतींना वाढीव चटई क्षेत्र मिळावे

### काँग्रेसची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

वार्ताहर

डोंबिवली, दि. १ – कल्याण–डोंबिवली महापालिका क्षेत्रातील ३० ते ४५ वर्षे जुन्या असलेल्या इमारतींना वाढीव चटई क्षेत्र मिळावे, अशी मागणी निवेदनाद्वारे काँग्रेसने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. कल्याण–डोंबिवली महापालिका अस्तित्वात येण्याअगोदर येथे ग्रामपंचायत राजवट होती. परिसरातील भूमिपुत्र शेतकरी बांधव शेती करुन उदरनिर्वाह चालवत होता. सर्वसामान्यांना अल्पदरात व परवडणारी घरे मिळण्यासाठी भूमिपुत्रांनी जमिनीचा त्याग करत घरे उपलब्ध करून दिली. शहराचा विकास व्हावा, याकरता आगरी–कोळी भूमिपुत्रांनी आपल्या जमिनी विविध आरक्षणांसाठी खुल्या मनाने दिल्या.

एमआयडीसी, डेडिकेट रेल्वे कॉरिडॉर, रिंगरुट इत्यादीसाठी जमिनी आरक्षित केल्याने मूळचा आगरी कोळी भूमिपुत्र भूमिहीन झाला असून तो उद्ध्वस्त होण्याची वेळ आली आहे. महापालिका क्षेत्रातील महत्त्वाचा भेडसावणारा प्रश्न म्हणजे वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक–एफएसआय. ग्रामपंचायत काळापासून ते आजपर्यंत सुमारे तीस ते चाळीस वर्षांत बांधलेल्या इमारती धोकादायक स्थितीत आहेत. कल्याण–डोंबिवली महापालिका इमारत बांधकामासाठी फक्त एक चटई क्षेत्र देते. तसेच जुन्या व धोकादायक बांधकामांना सध्याच्या अटी व शर्तींप्रमाणे जमीन मालक व यांना मोबदलाही मिळत नाही व राहत्या रहिवाशांना घरेही देण्यात येत नाहीत, असाच प्रश्न मुंबई पालिकेत निर्माण झाला होता. त्याला उपाय म्हणून तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या गरजा समजून त्यांच्या इमारत बांधणीसाठी चार चटई क्षेत्र मंजूर करून दिले व जमीन मालक व रहिवाशांचा प्रश्न सोडवला. त्याच धर्तीवर कल्याण–डोंबिवली महापालिका क्षेत्रात चार वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक मंजुरी मिळावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रवक्ते संतोष केणे यांनी केली आहे.

# विकलांगांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणे हे ईश्वरी काम

## डॉ. फेलिक्स मच्याडो यांचे प्रतिपादन सर्वधर्मिय विकलांग स्नेहमेळावा संपन्न

वार्ताहर

वसई, दि. १ – विकलांगांच्या सबलीकरण आणि सक्षमीकरणासाठी काम करणारी उमेद ही संस्था कौतुकास पात्र असून नाताळचा खरा गोठा येथे वसला आहे. तेव्हा लोकांनी या गोठ्याला वर्षभर भेटत राहावे आणि आपले योगदान द्यावे. विकलांगांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणे हे ईश्वरी काम असल्याचे सांगून आर्चबिशप डॉ. फेलिक्स मच्याडो यांनी 'उमेद'च्या कार्याला मनपूर्वक शुभेच्छा दिल्या.

उमेदचा तेरावा 'सर्वधर्मिय विकलांग स्नेहमेळावा ' उमेदच्या प्रांगणात झाला. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून डॉ. मच्याडो उपस्थित होते. उमेदाच्या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून अशा उपक्रमात सर्वधर्मिय विकलांगसोबत सामान्यजनांचा, प्रापंचिकांचा अजून सहभाग वाढायला हवा, असे ते म्हणाले. वसई –विरार महापालिकेचे उपमहापौर प्रकाश रॉड्रिग्ज, लुब ऑटोमॅटिक प्रा. लि.चे डायरेक्टर रोलन मच्याडो, बसिन कॅथॉलिक बँकेचे संचालक रूपेश रॉड्रिग्ज या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

उमेदचे संचालक फादर बॅप्टिस्ट लोपीस यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि मान्यवरांचे स्वागत केले. प्रास्ताविकात त्यांनी गेल्या वर्षभरातील उमेदमध्ये पार पडलेल्या उपक्रमाचा आढावा घेतला. चर्च तेथे शाळा हे चर्चचे सुरुवातीचे धोरण होते. मागील काही दशकांत या धोरणाचा पाठपुरावा घेतल्याने त्याची गोड फळे आता समाजात दिसून येत आहेत. त्यामुळे चर्च तेथे विकलांग केंद्र हे धर्मप्रांताचे पुढील धोरण असायला हवे, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाची सुरुवात इशस्तवनाने झाली. उमेदाच्या विकलांग मुलामुलींनी स्वागतगीत सादर केले. उपमहापौर प्रकाश रॉड्रिग्ज यांनी उमेदच्या कार्याचे भरभरून कौतुक केले. प्रतिवर्षी या गोठ्याला भेट देण्याचा आपला शिरस्ता यापुढेही चालू राहील, असे ते म्हणाले. या वेळी अध्यक्षांच्या हस्ते संस्थेचा छोटेखानी अंकाचे प्रकाशन झाले. एडवर्ड डाबरे यांनी पालकांच्या साक्षी आणि मुलाखती घेतल्या. त्या ऐकून उपस्थितांचे डोळे पाणावले. कार्यक्रमासाठी जवळपास एक हजार लोकांची उपस्थिती होती. तीन व्हीलचेअरची आणि रॅम्पची व्यवस्था केल्याने विकलांगांची ने– आण करणे सोईचे झाले. सेंट विन्सेट डी पॉल पार्टिकलर कौन्सिलिंग, वसईच्या सहभागामुळे हे शक्य झाले. वसई–विरारमधून आलेल्या संजीवनी, जीवदानी, लिबानिया निकेतन, होली क्रॉस या शाळेतील विकलांग मुलांनी बहारदार नृत्य सादर केली. सर्व विकलांगांना बक्षीस वाटप करण्यात आले. तर २५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.




**उमेदचा तेरावा 'सर्वधर्मिय विकलांग स्नेहमेळावा' उमेदच्या प्रांगणात झाला. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून डॉ. मच्याडो उपस्थित होते. उमेदाच्या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून अशा उपक्रमात सर्वधर्मिय विकलांगसोबत सामान्यजनांचा, प्रापंचिकांचा अजून सहभाग वाढायला हवा, असे ते म्हणाले.**


## कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय: २७ बीकेसी, सी २७, जी–ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, पिन कोड – ४०० ०५१**
**शाखा कार्यालय : मेझ्झानाईन मजला, सॅमसंग बिल्डिंग, विनय भव्य कॉम्प्लेक्स, १५९–ए, सीएसटी रोड, कलिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई–४०० ०९८**

**स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल, २००२ च्या नियम ८ (६) ला अन्वये स्थावर मत्तांच्या विक्री साठी ई–लिलाव विक्री सूचना.
सर्वसामान्य जनता आणि खास करून येथे खाली ज्यांचे तपशील दिले आहेत त्या कर्जदार आणि जामीनदारांना याद्वारे सूचना देण्यांत येते की, तारणी धनकोंकडे (अभिहस्तांकनकर्ते) गहाण/भारग्रस्त असलेल्या खाली वर्णन केलेल्या स्थावर मिळकती ज्या बँकेच्या थकबाकीची रोकड करण्याकरिता **''जसे आहे जेथे आहे'' ''जसे आहे जे आहे''** आणि **''जे काही आहे तेथे आहे''** तत्वाने विकल्या जातील.

| अनु. क्र. | १. कर्जदार आणि हमीदार आणि कायदेशीर वारसाचे नाव आणि पत्ता २. पासून व्याजासह एकूण देय | कब्जा दिनांक | स्थावर मिळकतीचे वर्णनासह कोणतेही भार ज्ञात असल्यास | १. ई–लिलावाची दिनांक आणि वेळ २. ईएमडीचे सादरीकरणाचा शेवटचा दिनांक ३. मिळकतीच्या निरिक्षणाचा दिनांक आणि वेळ | १. राखीव किंमत २. मिळकतीचे ईएमडी |
|---|---|---|---|---|---|
| १. | चँटिंग कंटेनर लाईन्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड सीआयएन क्र. – यू६३०००एमएच२०१०पीटीसी२०७७१० संचालकाच्या माध्यमातून श्री. रंजित सिंग आणि श्री. निशांत अमरनाथ सुत्रावे नों. कार्यालय येथे :– ३०४, अॅक्रोपॉलीस, मिलिट्री रोड, मरोल, अंधेरी (पूर्व) मुंबई – ४०० ०५९.<br>**येथे देखील :–** परिसर क्र. ४०३, ४था मजला, 'टी–स्क्वेअर' बिल्डिंग, साकी विहार रोड, (हंसा इंडस्ट्रीयल ईस्टेट समोर/चांदिवली सिग्नल) गाव मरोल, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०५९, महाराष्ट्र.<br>**येथे देखील :–** निशांत अमरनाथ सुत्रावे, द्वारा चेव्हीसन्स शिपिंग प्रा. लि. क्लासिक सेंटर, ४०४/४०५, ४था मजला, बी विंग, (पेपर बॉक्स जवळ), महाकाली रोड, अंधेरी (पू), मुंबई – ४०० ०९३, महाराष्ट्र.<br>**रंजीत सिंग, रमाशंकर सिंग यांचा मुलगा –** ३०१, ए विंग, एरगॉन अपार्टमेंट, हॉल रोड, हलाव पूल, कुर्ला (पश्चिम), मुंबई – ४०० ०७०, महाराष्ट्र.<br>**निशांत अमरनाथ सुत्रावे, अमरनाथ सुत्रावे यांचा मुलगा –** फ्लॅट क्र. १००१, १०वा मजला, सी विंग, वास्तु सिद्धी, वास्तु कॉम्प्लेक्स, राजमाता जिजाबाई रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००९३, महाराष्ट्र.<br>येथे देखील – २सी/६२ कल्पतरू इस्टेट सीएचएस लिमिटेड, मजास बस डेपो पुढे, जेव्ही लिंक रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००९३, महाराष्ट्र.<br>**साक्षी निशांत सुत्रावे येथे** : २सी/६२ कल्पतरू इस्टेट सीएचएस लिमिटेड, मजास बस डेपो पुढे, जेव्ही लिंक रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००९३, महाराष्ट्र.<br>**चँटिंग क्लियरिंग आणि फॉरवर्डिंग :–** ३०४, ३रा मजला, अक्रोपॉलीस इमारत, मिलिट्री रोड, मरोल, अंधेरी (पूर्व) मुंबई – ४०० ०५९, महाराष्ट्र.<br>**कर्ज खाते क्र. :–** ४०५सीएसएल००८२३८९६ आणि ४०५एफएसएल०१९४६७०८ आणि ४०५सीएसएल०१३२३६५०<br>**एकूण थकबाकी :–** रु. ४,२९,७९,२४९/– (रुपये चार करोड एकोणतीस लाख एकोणऐंशी हजार दोनशे एकोणपन्नास मात्र) दि. ३१.१२.२०१८ सह वर नमूद व्याजाच्या लागू दरासह संपूर्ण भरणा पर्यंत सर्व परिव्यय, प्रभार आणि खर्च. | ०४.०४.२०१८ **प्रत्यक्ष कब्जा** | मुंबई शहर आणि मुंबई उपनगर अंसा इंडस्ट्रियल इस्टेट, अंधेरी (पू), मुंबई – ४०० ०५९ नोंदणीकृत जिल्हा आणि उप–जिल्ह्यातील तालुका अंधेरी, गाव मरोळ, चांदिवली, साकीविहार रोड, सीटीएस क्र. ६८३, ६८३/ए, ६८३/१, ६८३/२, ''टी स्क्वेअर'' अशा ज्ञात इमारतीमध्ये स्थित साकी विहार रोड, सीटीएस क्र. ६८३, ६८३/ए, ६८३/१, ६८३/२, चांदिवली गाव मरोळ, अंसा इंडस्ट्रीयल इस्टेट समोर, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९. ''टी स्क्वेअर'' अशा ज्ञात इमारतीमधील ४थ्या मजल्यावर मोजमापित अंदाजे १५०० चौरस फूट चटई क्षेत्र (मजल्या योजनेतील दाखवलेले सर्व उपलब्ध क्षेत्राचा समावेश चटई क्षेत्र) कमर्शियल परिसर क्र. ४०३ चे ते सर्व भाग आणि विभाग. **सीमाबद्ध :–** उत्तर किंवा त्या दिशेने मिळकत धारक सीटीएस ६८४ ने, दक्षिण किंवा त्या दिशेने मिळकत धारक सीटीएस ६८१/ए ने, पूर्व किंवा त्या दिशेने मिळकत धारक सीटीएस ६८२ ने, पश्चिम किंवा त्या दिशेने मिळकत धारक सीटीएस २४.४० रूंद साकी विहार रोड ने. | **१) ई–लिलाव दिनांक :–** २४/०१/२०१९ स. ११.३० ते दु. १२.३० दरम्यान आणि ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह<br>२) ईएमडीचे सादरीकरणाकरिता शेवटचा दिनांक सह केवायसी २२/०१/२०१९ सायं ५.०० (आयएसटी)<br>**३) निरिक्षणाचे दिनांक** : ११ जानेवारी, २०१९ स. ११.०० ते दु. १.०० (आयएसटी) | **राखीव किंमत–** रु. १,९९,००,०००/– (रुपये एक करोड नव्याण्णव लाख मात्र)<br>**इसारा अनामत रक्कम–** रु. १९,९०,०००/– (रुपये एकोणीस लाख नव्वद हजार मात्र) |

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्ती कृपया वेबसाईटवरील लिंक **https://kotakbank.auctiontiger.net** पहावी.
इसारा रक्कम **''कोटक महिंद्रा बँक लिमिटेड''**च्या नावातील **बँगलोर** येथे किंवा ''कोटक महिंद्रा बँक लिमिटेड'' च्या खात्यात खाते क्र. ०६४१०१५७०२००२१ व आयएफएससी कोड–KKBK0000958, शाखा नरिमन पॉईंट मुंबई, शाखा कोड–०६४१ मध्ये एनईएफटी/आरटीजीएस द्वारे जमा करावी.
विक्री करावयाच्या मत्तांच्या संबंधातील कोणत्याही स्पष्टीकरण/आवश्यकतांच्या बाबतीत बोलीदारांनी **श्री. निक्की कुमार (+९१ ७०४५९००५५१ दूरध्वनी– ०२२–६६७६ ८४५७) आणि श्री. पंकज राय (मोबाईल क्र. +९१ ७७६८००३५६७ दूरध्वनी क्र. ०२०–६७४४३१०७)** येथे संपर्क साधावा.

**प्राधिकृत अधिकारी**
**ठिकाणः मुंबई, दिनांकः ०२.०१.२०१९** **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**